# जे बोलले, ते सत्यच

अध्यात्मात सत्य-असत्याची जशी तुलना केली जाते, तसे राजकारणातही निष्ठा-तत्त्व-आचार विचार आणि गद्दारी या बाबींचीही तोलाई केली जाते. जो खोटे बोलतो, आचरण ठेवून वागत नाही, अशी व्यक्ती अध्यात्मात चालत नाही.तिथे ती असत्य ठरते.जो खरे बोलतो त्याला अध्यात्म सत्यवादी म्हणत असते. पक्ष सोडून जाणाऱ्याला गद्दार म्हटले जाते. स्वार्थी म्हणून त्याला हिणवले जाते. राजकीय क्षेत्रात चाललेले हे महानाट्य आपण रोज पहात असतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह त्यांच्या ४० पाठीराख्या आमदारांनी शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर त्यांना आजही ठाकरे गट गद्दार म्हणून हिणवत आहे. उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि संजय राऊत हे तिघे विशेष करून शिंदे गटावर गद्दार म्हणून रोज शाब्दिक हल्ला चढवत असतात. मग मुख्यमंत्री शिंदे व त्यांचे सहकारी गप्प कसे बसतील? कोल्हापूरच्या अधिवेशनात शिंदे यांनी ठाकरे यांच्यावर चौफेर टीका केली. अक्षरशः ठाकरेंना धुऊन काढले असे म्हणायला काहीच हरकत नाही. गद्दार म्हणणाऱ्यांना त्यांनी जशास तसे उत्तर दिले आहे. पक्षात असताना निष्ठावंतांची कदर करायची नाही. त्यांच्या भावना ऐकून घ्यायच्या नाहीत. त्यांना भेटायचे नाही मग कुठला कार्यकर्ता पक्षात राहील? असा शिंदे यांनी विचारलेला सवाल योग्यच ठरतो. २०१९ च्या निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोटो वापरून मते मिळवली. लोकांनी बहुमत दिले. तरीही युतीशी गद्दारी करून दोन काँग्रेसशी हातमिळवणी केली. ही गद्दारी नव्हे काय? अशा शब्दात शिंदे यांनी जो संताप व्यक्त केला, त्यात गैर काय? १९९५ मध्ये युतीची पहिल्यांदा सत्ता आली,



तेव्हा शिवसेनाप्रमुखांनी सत्तेला लाथ हाणली व स्पष्टपणे म्हणाले होते की,मी मुख्यमंत्री होणार नाही. बाळासाहेबांनी पहिल्या फळीतील निष्ठावंत नेते मनोहर जोशी यांना मुख्यमंत्री करून सत्तात्याग करणारा पक्षप्रमुख म्हणून राज्यापुढे आदर्श ठेवला. महाविकास आघाडी करून उद्धव यांनी पुन्हा मोठी चूक नव्हेतर घोडचूक केली. स्वतः मुख्यमंत्री झाले. उद्धव यांची सत्तेची लालसा लपून राहिली नाही. वास्तविक पाहाता ज्येष्ठ म्हणून मुख्यमंत्रिपदावर शिंदे यांचाच अधिकार होता. उद्धव यांनी हा निर्णय घेतला असता तर त्यांची राजकीय उंची वाढली असती,मनाचा मोठेपणा दिसून आला असता आणि पक्षही वाचला असता. शिवसेनाप्रमुखांच्या आदर्शाकडे बोट करत शिंदे यांनी उद्धव यांच्यावर केलेली जी टीका केली त्यात सात्त्विक आक्रमकपणा होता, असे म्हणावे लागेल. पक्षात निष्ठेची कदर झाली नाही तर सामान्य कार्यकर्त्यालाही पक्षप्रमुखाच्या विरोधात हत्यार उपसावे लागते. निष्ठावंत आणि सत्याने काम करणाऱ्या कार्यकर्त्याला अपमान असह्य होत असतो. एक दोन नव्हे तर ४० आमदार बाहेर पडत शिंदेंसोबत जातात हा काही जोक नव्हे. उद्धव यांच्या कारभाराविषयी किती खदखद होती हेच त्यातून सूचित होते. निष्ठावंतांची कदर केली असती तर...शिवसेना वाढवण्यासाठी बाळासाहेबांसमवेत ज्यांनी काम केले आहे त्यांच्या नावाने शिवसन्मान पुरस्कार देण्याचा ठराव करवीरनगरीच्या अधिवेशनात पारित करण्यात आला. यामध्ये दत्ताजी साळवी या नावाने उत्कृष्ट कामगार पुरस्कार, सुधीर जोशी यांच्या नावाने नावीन्यपूर्ण नवउद्योजक पुरस्कार, प्रमोद नवलकर यांच्या नावाने उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार, दत्ता नलावडे यांच्या नावाने आदर्श शिवसैनिक, दादा कोंडके यांच्या नावाने कला क्षेत्रातील उत्कृष्ट पुरस्कार, वामनराव महाडिक यांच्या नावाने शिक्षण क्षेत्रातील पुरस्कार, उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ता हा पुरस्कार शिवसेना नेते शरद आचार्य यांच्या नावाने दिला जाणार आहे. हे पुरस्कार शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त जाहीर होणार असून, त्याचे वितरण शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होईल, अशी माहिती उदय सामंत यांनी अधिवेशनात दिली. आम्ही या निर्णयाचे स्वागत करतो. ह्याला निष्ठावंतांची कदर म्हणतात. उद्धव यांची आजची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. तेलही गेले, तूपही गेले,अशी त्यांची गत झाली आहे. आता वेळही निघून गेली. महाविकास आघाडीचे अस्तित्वही संपले.आता कोण जवळ करेल? बाळासाहेबांनी निष्ठावंतांना माया दिली. त्यांची कदर केली.याची जाण उद्धव यांनी ठेवायला हवी होती. शिंदे जे बोलले ते सत्यच.

## जनमानस

### 'दंगल' गर्ल सुहानीची धक्कादायक एक्झिट



आमिर खानच्या दंगल चित्रपटाच्या माध्यमातून चर्चेत आलेली छोटी बबिता जिने 'बापू सेहत के लिए' म्हणत प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या सुहानी भटनागरच्या मृत्यूमुळे चित्रपसृष्टीवर शोककळा पसरली आहे. काही दिवसांपूर्वी तिचा अपघात होऊन तिचा पाय मोडला होता, त्यामुळे तिच्यावर उपचार सुरु होते.

आमिर खानच्या 'दंगल' चित्रपटात सुहानी भटनागर हिने छोटी बबिताची भूमिका केली होती. या चित्रपटात ती आमिर खान, साक्षी तन्वर आणि जायरा वसीमसोबत दिसली होती. तिच्या त्या भूमिकेनंतर तिचं कौतुकही झालं होतं. 'दंगल'नंतर सुहानी अनेक जाहिरातींमधूनही झळकली होती. मात्र त्यानंतर तिने अभ्यासावर लक्ष केंद्रीत करून शिक्षणावर भर दिला होता. वयाच्या १९व्या वर्षी सुहानीने या जगाचा निरोप घेतला आहे. 'दंगल' चित्रपटात तिने आमिर खानच्या छोट्या मुलीची भूमिका साकारली होती.

सुहानी बॉलिवूडमधील प्रसिद्ध बालकलाकार होती. तिने २०१६ मध्ये आमिर खानच्या 'दंगल' या चित्रपटात दमदार भूमिका साकारली होती. यामध्ये तिने ज्युनिअर बबिता फोगाटची भूमिका साकारली होती. याशिवाय तिने बऱ्याच जाहिरातींमध्येही काम केलंय. 'दंगल' या चित्रपटानंतर सुहानीने काही काळ ब्रेक घेतला. अभ्यासावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी आणि शिक्षण पूर्ण करण्यासाठी तिने चित्रपटांचे आणखी ऑफर्स स्वीकारले नव्हते. मात्र शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुन्हा मोठ्या पडद्यावर काम करणार असल्याचं तिने अनेक मुलाखतींमध्ये सांगितलं होतं अशा या सुहानीचं अकाली एक्झिट झाल्याने संपूर्ण मनोरंजन विश्वासह तिचा चाहता वर्ग शोकसागरात बुडाला आहे !

- राजू जाधव, बेळगाव.

### गृहिणीची जाणीव घरातील सदस्यांना असावी

कुटुंबाची काळजी घेणारी गृहिणी स्वतःचे खानपान, आरोग्य, स्वतःची हौसमौज याबद्दल उदासीन असते.

आज अनेक घरे, कुटुंबे गृहिणीच्या त्यागावर व कालसुसंगत भूमिका घेऊन करीत असलेल्या त्यांच्या मेहनतीवर, उपायांवर भक्कमपणे उभी आहेत, प्रगती करीत आहेत.

कुटुंबातील सर्व सदस्य सुखी, निरोगी असावेत त्यांची शिक्षणे व आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर वाटचाल सुरळीत असावी यासाठी गृहिणी धडपड करते, प्रसंगी कठोर भूमिका घेऊन योग्य उपाय करते. याची जाणीव घरातील सदस्यांना असावी ही अपेक्षा.

- अर्चना काळे, नाशिक.

शिवजयंती विशेष

# शिवरायांचे स्त्री विषयक दृष्टिकोन

**जगातल्या अनेक राजाच्या दरबारात स्त्रीने नाचगाणे सादर केलेले आहे पण जगात एकमेव असा राजा झाला त्याच्या दरबारात स्त्री कधीच नाचली नाही. परस्त्री मातेसमान अशी शिकवण राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना दिले. छत्रपती शिवाजी राजांचा इतिहास जेवढा ढाल-तलवारीचा आहे, त्यापेक्षा अधिक रचनात्मक कार्याचा, परिवर्तनाचा सामाजिक न्यायाचा, स्त्री स्वातंत्र्याचाही आहे. शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास अनेक अंगानी करता येतो. त्यापैकी शिवरायांचे स्त्री धोरण हा शिवचरित्रातील महत्त्वाचा भाग आहे. सतराव्या शतकात शिवरायांची स्त्री विषयक भूमिकाच्या २१व्या शतकात देखील दीपस्तंभ सारखी आहे. अनिष्ट चालीरीतीचे जोखड भारतीय समाज मनावर असताना शिवरायांची १७ व्या शतकातील स्त्री विषयक भूमिका अत्यंत क्रांतिकारक ही होती.**

छत्रपती शिवाजी राजांनी आपल्या मातेचा म्हणजे राजमाता जिजाऊ साहेबांचा प्रत्येक शब्द शिरसावंद्य मानला. जहागिरीची सांभाळणूक वगैरेतील शिक्षणानुभव शिवाजी महाराज यांना त्यांच्या मातेकडूनच मिळाले होते. मोठे झाल्यावरही शिवाजी महाराज आपल्या मातेच्या मार्गदर्शनाची अपेक्षा करीत होते. शिवरायांचे स्वराज्य म्हणजे मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचा एक आदर्श आहे. आपल्या मातेचा आदर करणारे शिवाजीराजे महिलांच्या विचारांचा, सगळ्याचा सन्मान करणारे राजे होते, स्त्रियांना दुय्यम लेखणारे नव्हते. छ. शिवाजी महाराजांनी आपल्या सर्व महाराण्यांचा आदर केला. संकटसमयी त्यांच्याशी कूट प्रश्नावर विचारविनिमय केला. युद्ध मोहिमेवर जाण्यापूर्वी महाराजांनी आपल्या महाराण्यांशी चर्चा केली. शिवरायांनी महिलांना कधीही तुच्छतेची किंवा दुय्यम दर्जाची वागणूक दिली नाही. शिवरायांनी रायगडावर आपल्या सर्व महाराण्यांसाठी स्वतंत्र महल बांधले. प्रत्येक महालात स्वतंत्र स्वच्छतागृहाची सुविधा होती. महिलांच्या प्राथमिक प्रश्नापासून ते सुरक्षिततेपर्यंत सर्व प्रश्नाकडे महाराजांचे अत्यंत सूक्ष्म लक्ष होते, त्यासाठी त्यांनी उपाययोजना केली. शिवरायांनी स्वराज्यातील व परराज्यातील स्त्रियांचा आदर केला. ज्याला यश पाहिजे त्याने स्त्री अभिलाषा धरू नये.

**'स्त्री ही मराठ्यांच्या देव्हाऱ्यातील देवता आहे, या देवतेचा आपण आदर केला पाहिजे'**, अशी शिवरायांची भूमिका होती. यामुळेच मोगलाचा इतिहासकार काफीखान देखील शिवरायांच्या स्त्रीविषयक धोरणाचे मुक्तकंठाने कौतुक करतो की, 'शिवाजी महाराज हे शत्रूच्या स्त्रियांना देखील बहिणीप्रमाणे, आईप्रमाणे वागवत, त्यामुळेच शिवाजीराजांच्या राज्यात महिला अत्यंत सुरक्षित होती. शिवाजी महाराज अत्यंत चरित्रसंपन्न, नीतिमान असे राजे होते. त्यामुळेच त्यांनी महिलेशी बदअंमल करणाऱ्या रांझाच्या पाटलाचे हात-पाय कलम करण्याची कठोर शिक्षा ठोठावली. महिलांच्या संरक्षणासाठी शिवरायांनी कोणाचाही मुलाहिजा बाळगला नाही, त्यामुळेच शिवकाळात महिला निर्भीडपणे पुढे आल्या. रायगडाच्या पायथ्याशी राहणारी हिरकणी मोठ्या हिमतीने कडा उतरून खाली आली. हिरकणीच्या या निर्भीडपणाचे, शौर्याचे, कष्टाचे वर्णन करताना शिवाजी महाराज हिरकणीला म्हणाले, 'अतिउंच आणि क ठो ण असा कडा उतरून बाळाच्या ओढीने घरी जाणारी तुमच्यासारखी निर्भीड आई जोपर्यंत आपल्या स्वराज्यात आहे, तोपर्यंत आपले स्वराज्य कोणालाही जिंकता येणार नाही.



हिरकणीच्या गौरवार्थ शिवरायांनी त्या ठिकाणी बांधलेल्या बुरुजाला 'हिरकणीचे बुरूज असे नाव दिले. शिवरायांच्या स्त्री धोरणाची साक्ष देणारा हिरकणी बुरुज आज देखील रायगडावर आपणास दिसतो. यावरून शिवाजी राजे हे स्त्रीच्या धाडसाचे कौतुक करणारे राजे होते हे देखील सिद्ध होते. हिरकणी प्रकरणावरून शिवकाळात महिला निर्भीडपणे उद्योग व्यवसायात होत्या हे जाणवते. शिवरायांनी शत्रूच्या स्त्रिया देखील मातीप्रमाणे आदर केला. शिवराय चारित्र्यसंपन्न होते, शिवरायांनी महिलांना हक्क अधिकार दिले. 'स्त्री ही चूल आणि मूल' या परियातच असावी अशी शिवरायांची भूमिका नव्हती. त्यामुळेच शिवरायांचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कन्या आणि शिवरायांच्या सुनबाई महाराणी ताराबाई हातात तलवार घेऊन घोड्यावर बसून शत्रू विरुद्ध लढण्यासाठी रणांगणावर आल्या. त्यांनी औरंगजेबाला सळो की पळवून सोडले. महाराणी ताराराणीचा पराक्रम, कर्तृत्व आज सर्वांना माहित आहे. संभाजीराजांच्या महाराणी येसूबाई यांनी तर उत्तमप्रकारे प्रशासन चालवले. त्या स्वराज्याच्या कुलमुकत्यार (अत्यंत महत्त्वाचे पद आजच्या राष्ट्रपतीप्रमाणे) होत्या. शिवरायांच्या उदार-उदात्त स्त्री धोरणामुळेच महाराणी ताराबाई व येसूबाई राणीसाहेब कर्तृत्व गाजवू शकल्या.

शिवरायांनी सावित्रीबाई देसाई, रायबाधीन देशमुख या विरोधात लढणाऱ्या मुलींचा देखील आदर केला. शिवाजी महाराज मोगल, आदिलशहा विरुद्ध लढले, पण विरोधकांशी अत्यंत नैतिकतेने लढणारा राजा म्हणजे शिवाजीराजा होय. विरोधकांच्या स्त्रियांचे संरक्षण व सन्मान केलाच, पण त्यांनी त्यांना हक्क, अधिकार देखील दिले. राज्याभिषेकप्रसंगी शिवरायांनी राजमाता जिजाऊंना सन्मानाने मानाच्या आसनावर बसविले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शेवटपर्यंत राजकारभार केला.

शिवाजी महाराज आज असते तर महिलांना छळणाऱ्यांवर तात्काळ कठोर शासन केले असते. मुलींना दर्जेदार उच्च शिक्षण दिले असते, शिवरायांनी महिलांना घोड्यावर बसण्याचे स्वातंत्र्य दिले. आज महाराज असते तर मुलींना विमानचालक पायलट करण्याचे शिक्षण दिले असते. शिवाजी महाराज पुरोगामी विचारांचे होते. सर्वांना 'स्वातंत्र्य' ही शिवरायांची भूमिका होती स्त्री ही पुरुषांप्रमाणे शारीरिक, बौद्धिक व मानसिकदृष्ट्या सक्षम आहे ही शिवरायांची भूमिका प्रकर्षाने जाणवते.

- आनंद व्हटकर,सोलापूर.


# 'शिवचरित्र' राष्ट्रविचाराचं पावन पवित्र महाकाव्य

'द. छत्रपती शिवराय' या कवी यशवंतांच्या महाकाव्यातून बालपण चित्रित केले आहे. यातील 'गिरीकंदरी ' या कवितेतून कवी यशवंत शिवबा यांच्या बालपणाविषयींचं जीवन अभिव्यक्त करतात. शिवबा दऱ्या कपाऱ्यातून निसर्गाच्या रूप आव्हानांना स्वीकारत शिकत राहिले, यातून वैभव संपन्न संस्कार झाले. या कौशल्यपूर्ण चैतन्याला संपादन करून लालमहालात परतले. पुणे सुपे या जहागिरीवर सुलतानी अन्यायाविरुद्ध आता शिवबांनी शस्त्र उगारले होते. पुण्यामध्ये आधार जिजाऊचा छावा,त्योच की अवतरला देव, भार त्यावरी घालावातिथल्या जनतेला शिवबा व त्यांच्या कारभाराचं मोठं कौतुक वाटे, आधार वाटे. दिलासा देतो दुबळ्यांना, भयाने गांगरले त्यांना प्रेरणा देऊनी विश्वास लाविती नव्या उद्यमांना, असे 'मावळा'मध्ये कवी म्हणतात.' लाल महालातील 'या काव्यात शिवबांची न्याय पद्धती, जिजाऊंची धीरता प्रजा अनुभवत होती. तसेच बारा मावळ्यातील वतनदार भाऊबंदकीत घातपात आप्तांचे वाईट करण्यास टपले होते. त्यांना आपलं परकं कळत नव्हते. या प्रवृत्तीविषयी कवी म्हणतात,

'गुलाम झाली माय-तुम्ही  
हो जिचे म्हणविता पूता!  
वतन नव्हे परसेवेची  
केवळ निंद निशाणी  
स्वजातीयांच्या सेवेची  
का सोय न घेता ध्यानी?

ही जाणीव करून देऊन स्वराज्याची सुराज्याची विचारधारा वाचकांच्या विचारात पेरली आहे की, ज्यायोगे राष्ट्रीय अस्मितेची जाण येऊन स्वातंत्र्यसंग्रामात ते सामील होतील. काळ कोणताही असू द्या स्वराज्य व सुराज्यासाठी या प्रवृत्ती घातकच असतात. म्हणून या शिवचरित्राची उपयुक्तता सर्व काळात आहे हेच कवी यशवंतांच्या, 'छत्रपती शिवराय' या राष्ट्रीय महाकाव्याचे फलित आहे. बाळ शिवबा दिसामासाने वाढताना स्वराज्याच्या निर्मितीचे स्वप्न प्रत्यक्षात आणत आहेत हे लक्षात येताच जिजाऊंना शिवबांच्या राष्ट्रभक्तीचं व त्यांच्या राष्ट्र उभारणीचं कौतुक वाटे. पुरंदर सर करताना मावळ्यांनी शिकस्त केली.

'भले शाबास शाबास, अहो जीवाचे मैतर शब्द राजाचे करिती त्यांचा श्रमपरिहार' त्यांना खूप आत्मविश्वास आता आला. पुढे खानाचा समाचार कसा घ्यायचा याचा विचार पक्का झाला. तेव्हा कवी सांगतात. गरुडाची नजर प्राप्त शिवबा, नजरेने सर्वकाही हेरत व आपल्या मावळ्यांना स्वत्वाचं भान आणून देत आणि चारही शत्रूंच्या विषयी कसं वागलं पाहिजे याचा मूलमंत्र ते देतात. यातूनच 'एकनिष्ठ' असे स्वराज्यवीर निर्माण करता आले आणि ते वीर कामासही आले. कोणतेही राष्ट्र हे राष्ट्रप्रती असणाऱ्या प्रजेच्या निष्ठेनेच निर्माण होत. हा लाख मोलाचा संदेश आजही उपयुक्त आहे. राष्ट्राप्रती निष्ठा हवी.पुरंदर हा सहज मिळत नाही यासाठी खूप मोठी किंमत राजांना मोजावी लागत आहे. आपले स्वकीयच जेव्हा आपल्या विरोधात उभे राहतात तेव्हा मावळे सुद्धा त्यांना बोल देतात. अशा या घाई गर्दीमध्ये बाजी पालकर आणि इतर धुरंदर मावळे धारातिर्थी पडतात तेव्हा सहजच शिवबांच्या मुखी येते की,





एवढा यशस्वी दिला सामना आम्ही  
मोहरा अखेरीस यावा ऐसा कामी  
हळहळून यापरी वदती शिवाजीराजे  
रणविजयी का हानिवरीच विराजे?

'ग्रहणाचे दान' या कवितेत फत्तेखानाला नेस्तनाबूत करून मावळ्यांनी पुरंदर मिळवला. हा विजय शहाजीराजांना त्रासदायक ठरला म्हणून जिजाऊंना काळजी वाटते. तसेच संभाजी राजे यांनीही फरा खानची फजिती केली. दोन्ही बाळांच्या विजयाने एकीकडे जिजाऊंना आनंद वाटला, तर दुसरीकडे शहाजीराजांना यामुळे दगा होईल म्हणून मन कचरत होते, तसेच झाले. शहाजीराजेंना बंदी केल्याचे समजले. पुढे परकीय साम्राज्याला तडाखा देताना तो धैर्याने द्यावा हा संदेश ब्रिटिश काळात कवी देतात. शिवबांनी बादशहाला पत्र लिहिले. या पत्राच्या भीतीने मोहम्मद शहाने शहाजीराजांना आदराने मुक्त केले. शिवाजीराजांची राजनीती इथं कामाला आली. कोणतेही युद्ध शक्ती, युक्ती, कौशल्य, तप व राजनीतीने जिंकता येते त्यासाठी काही दानही द्यावे लागते. शहाजीराजे यांना सोडविण्यासाठी कोंडाणा द्यावा लागतो, हेच यानिमित्ताने वाचकांना कवी सांगतात. स्वराज्य चळवळीमध्ये सर्वांनी योगदान द्यायला हवे हे परकीय ग्रहण सोडविण्यासाठी त्यागही करावा लागतो. हा संदेश कवी देतात.

**शक्ती युक्ती प्रभावाने  
अरिष्ट वारीले जरी,  
आशीर्वाद असावेत  
द्विजांचे आपल्या शीरी ।**

ही भावना फार महत्त्वाची आहे. म्हणूनच जिजाऊंनी महाबळेश्वरला जाऊन सूर्यदेवाची आराधना केली. जसे संतांची आयुधे टाळ, वीणा, मृदंग आहेत तसेच राज्य चालवण्यासाठी जनकल्याण, भक्ती, स्वधर्म, राजनीति या गोष्टी जागरूकपणे केल्या पाहिजेत. नाहीतर हानी होते.कोंडाणा द्यावा लागल्यामुळे शल्य बोचत होते. पुरंदरावरील मतभेद मिटविण्यासाठी कवी म्हणतो, 'एखादा निर्णय घेण्यासाठी उद्दिष्ट लक्षात घेणं महत्त्वाचं तेव्हा तो गुंता सुटतो.' या विचाराने संभाजी मोहिते यांचा सुप्याचा गुंता व चंद्रराव मोरे यांच्या जहागिरीचा प्रश्नही शिवबा सोडवतात.पण शिशुपालाप्रमाणे चंद्रराव मोऱ्यांना राजांनी धडा शिकवला. जंजिरा दुर्गाची निर्मिती केली. साम्राज्याच्या सीमा वाढवल्या. अशीच लहानातून महान निर्मिती करायची असते. हे,' काही मामले ' काव्यातून व्यक्त केले आहे.तर ,' धुंद उडविली ' या काव्यामध्ये शिवाजीराजे यांच्या विजयाची घोडदौड सुरू होती.अनेक प्रदेश जोडले गेले. शिवचरित्र चित्रित करताना कवी समकालीन परिस्थितीला जोडून स्वातंत्र्य चळवळीत वाचकांना सामावून घेत आहेत. गड तुंग तीकोना जिंकूनिया लवलाही

गिरदुर्गमणी गुंफुनी असे चाळीस  
हार तो अर्पिला स्वतंत्रता देवीस  
सुलतान विजापुरी होता विकलं.

बादशा व सर्व शाह्या शिवाजी महाराजांच्या पराक्रमानं अवाक् झाल्या, तेव्हा अफजल खानाला स्वारीवर पाठवले. या महिषासुराचा असा अंत झाला. हे मुळातून वाचावे अशी वर्णने कवीने केली आहेत. या काव्यातून महाराष्ट्र भूमीने नेहमीच हिंदुस्थानाला नवविचार आणि कृतीची दिशा दिलेली दिसून येते. या उद्देशाने हे काव्य लिहिले आहे. सर्वांना वाटत होतं की अफजलखानाच्या स्वारीने शिवाजी राजे आता खिळखिळे झालेत परंतु जेव्हा राजांनी विजय प्राप्त केला तेव्हा,

देश बांधव म्हणती,' हे तो अवतारी कृत्य!  
हृदयस्थ नारायण, टाकी मारुनिया दैत्य.

यावरून ये लक्षात येते की कोणतेही कार्य प्रथम कठीण वाटते, अनेक विरोधक असतात, अनेक जण भीतीने धैर्य खचवत असतात परंतु विजय प्राप्त झाल्यानंतर सर्वजण अवाक् होतात. तसंच स्वातंत्र्य संग्रामात सुद्धा सुरुवातीला क्रांतिकारक कमी असतील परंतु याच क्रांतिकारकांच्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळेल, हा आत्मविश्वास या काव्यातून रुजतो आहे. तेही सहजपणे कवी संदेश देत आहेत.

'पन्हाळ्यावरी' सिद्धी जोहारच्या वेढ्याने शिवाजी राजे पुते वेढले गेले. तरीही हार न मानता विचार आणि कृतीनं तोंड देत राहिले. किल्ला अखंड पावसात सुद्धा लढवत राहिले. यानंतर त्यांनी पन्हाळ्यावरून विशाळगडाकडे जाण्यासाठी एक योजना आखली त्यामध्ये शिवा काशिद यांनी स्वराज्यासाठी हासत हासत मरण पत्करले आणि बाजीप्रभू देशपांडे यांचे पावनखिंडीतलं योगदान अतिशय मोलाच आहे. कोणतेही राज्य उभारायचं असेल तर जीवाला जीव देणारी माणसं जपली पाहिजेत .त्यांच्या राष्ट्रसेवेचं चीज केलं पाहिजे. तरच त्यांना खरी आदरांजली मिळत असते. या राष्ट्र निर्मितीच्या विश्वासाने अनेक कार्यकर्ते स्वातंत्र्यासाठी जीव पणाला लावतात. त्यांच्या सेवेचं चीज केलं पाहिजे.हा संदेश पारतंत्र्यामध्ये महत्त्वाचा होता तो आजही सुराज्यासाठी अति मोलाचा आहे....


- प्रा. डॉ. सुवर्णा चव्हाण-गुंड, सोलापूर.

# प्रजावत्सल राजा

छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनच एवढे भव्य आहे की त्यांच्या कुठल्याही गुणाला त्यांच्या काळातच नव्हे तर आताच्याची कित्येक शतकात तोड नाही असा हा राजा केवळ पुण्यवंत नाही तर नीतीवंत राजा होता.

**निश्चयेचा महामेरू ।  
बहुत जनाशी आधारू ।  
अखंड स्थितीचा निर्धार ।  
श्रीमंत योगी ।।**

अशा शब्दात त्यांचे वर्णन केले जाते. शिवाजी महाराज श्रीमंत तर होतेच पण योगीही होते. दक्षता, कणखरता आणि तत्परता यांचा स्थायीभाव होता. शिवछत्रपतींच्या शब्दकोषात आळस नव्हता उत्साह होता. चंचलता नव्हती निग्रह होता. मोह नव्हता ममता होती. भोगवान नव्हता त्यागवाद होता. लोकहितदक्ष धर्माभिमानी पण परमधर्म सहिष्णु चारित्र्यसंपन्न असा हा जाणता राजा होता. शिवाजी महाराजांच्या काळात कुणबी, मराठे, शेणवी, न्हावी, महार, कोळी, भंडारी, रामोशी, धनगर अशा ५६ जातींचे लोक होते. सर्व जातीतील गुणवंतांना शिवरायांच्या सैन्यात प्रवेश मिळेल. माणसाची पारख करून त्यांच्या सैन्यात समावेश केला जाई. शिवराय सवीच्या वेळी सर्व सैनिकांची व्यक्तिगत तपासणी करायचे. सैनिकांना नियमित वेतन व कामगिरी नुसार बक्षीस देत पण कडक शिस्त ठेवत. गडबांधणीचे शास्त्र शुद्ध ज्ञान पोर्तुगीजाकडून शिकण्याची दूरदृष्टी महाराजांकडे होती. शिवाजी महाराजांची कार्य हे त्या राज्यात राहणाऱ्या सर्वसामान्य माणसाला आपले वाटत. संत तुकाराम यांना लोक कल्याणकारी राजा नजरेस पडले तर महात्मा फुले यांना कुळवाडी भूषण दिसले. दिव्यातील ज्योत विझल्याशिवाय झोपी जाऊ नकोस अन्यथा उंदीर



दिव्यातील पेटती ज्योत पळवतील. कडब्यांच्या गंजी पेटतील. गुराढोरांना चारा मिळणार नाही. गुरेढोरे दूध देणार नाहीत. माझ्या रयतेची मुले दुधापासून वंचित राहतील. माझा महाराष्ट्र दुबळा होई तरी दिव्यातील ज्योत विझल्याशिवाय झोपी जाऊ नकोस. यातून शिवरायांची शेतकऱ्यांबद्दल काळजी स्पष्ट होते.

रयत सुखी तरच राजा सुखी असा शिवरायांचा राज्यकारभाराचा दरारा होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजवटीत जमिनीची तीन वेळा मोजणी केली. प्रथम सन १६३९ दादोजी कोंडदेवच्या वेळी नंतर १६४९ मोरोपंत पिंगळे यांनी शेवटी राज्याभिषेकानंतर सचिव अण्णाजी दत्तो यांनी १६७८ मध्ये जमिनीची मोजणी करून जमिनीची प्रत वाढवून प्रत्येक गावचे जमिनीचे महसूल पत्र तयार केले त्यांनी एका आज्ञापत्रात लिहिले की, तुम्हाला शेतकऱ्यांकडून अतिरिक्त कर वसूल करता येणार नाही. शेतात पिकलं नाही तर शेत सारा वसूल करता येणार नाही. दुष्काळ पडला तर शेतसारा माफ करावा. उत्पन्न पाहून शेतसारा लावावा. अशाप्रकारे महाराजांनी आदेश दिले होते. त्यांनी केवळ मराठा क्षत्रियंनाच नाही तर रामोशी, कोळी, मुस्लीम, बेरड, महार, मांग, माळी या जातीमधून व शेतकऱ्यांमधून आपल्या सैनिकांची नेमणूक केली म्हणजेच महाराजांनी क्षत्रिय बनवले. त्यांना स्वराज्याचा महत्त्वाचा भाग केला. बहुजन प्रतिपालक व कुळवाडी भूषण बनले.

- अमोल भोसले, सोलापूर.